पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, सेंट्रल बिल्डींग,तिसरा मजला, पुणे-४११ ००१.
पीबीएक्स-०२०-२६१२६६२८/२६४२६७८५/२६११४०६४,फॅक्स-२६१२७००४/२६१३२४०१
Email-dirmktms@gmail.comwebsite- www.mahapanan.maharashtr.gov.in

जा.क्र.पणन-५/परिपत्रक /सन २०२० / ९७४                                    दिनांकः- १६ मार्च २०२०

**विषयः-** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत.

**-: परिपत्रक :-**

शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड - १९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७,दिनांक १३/३/२०२० पासून लागू करून खंड -२,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचाना निर्गमित केलेली आहे.

कोरोना रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. त्यासाठी सर्व बाजार समित्यांनी त्यांच्या बाजार आवारात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात.

१. कोरोना रोगांसंबंधी जनजागृती होण्यासाठी बाजार क्षेत्रात लोकांना कोरोना रोगांपासून काळजी घेणेबाबत फलक / उद्घोषना याव्दारे आवाहन करावे व आवश्यक ती माहिती द्यावी.
२. बाजार समिती कार्यक्षेत्रातील बाजार व उपबाजार क्षेत्रातील परिसरामध्ये ठिकठिकाणी कोरोना रोगासंबंधीच्या माहितीबाबतचे मार्गदर्शक फलक लावण्यात यावेत. (सोबत नमूना)
३. बाजार आवारात सार्वजनिक स्वच्छता ठेवण्याकडे संपूर्णपणे लक्ष ठेवण्यात यावे.
४. बाजार आवारातील सर्व घटकांना हात धुण्यासाठी बाजार समितीचे बाजार आवारात पुरेशा प्रमाणात पाण्याच्या नळांची व्यवस्था करावी. शक्य असल्यास हॅंडवॉश,सॅनिटायझर इत्यादीची सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात किंवा बाजार घटकांना तश्या सूचना निर्गमित कराव्यात.
५. बाजार आवारात अनावश्यक गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सर्व बाजार समित्यांनी सदर सुचनांची काटकोरपणे अंमलबजावणी करून कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

(सुनिल पवार)
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. सरव्यवस्थाक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,मार्केटयार्ड,पुणे -३७

त्यांना कळविण्यात येते की संबंधीत परिपत्रक उचित अंमलबाजावणीसाठी सर्व आठवडी बाजार नियंत्रकांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

२. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (सर्व)

# सर्व बाजार घटकांना जाहीर आवाह

## करोना विषाणू पासून सावध रहा.

## करोना विषाणूची आजाराची लक्षणे




करोना विषाणूची लक्षणे ही मुख्यत्वे श्वसनसंस्थेशी निगडीत असतात. ती सर्वसाधारणपणे इन्फ्लुएन्झा आजारासारखीच असतात. सर्दी, खोकला, श्वास घ्यायला त्रास होणे, ताप, न्युमोनिया, काही वेळा मूत्रपिंड निकामी होणे अशी लक्षणे आढळतात.

## करोना विषाणू पासून सावध राहण्यासाठी

### हे करा.. ✓



**आपले हात वारंवार स्वच्छ धुवा**

नियमितपणे साबण व पाणी वापरून आपले हात स्वच्छ धुवा.

**का करावे?**

नियमितपणे साबण व पाणी वापरून आपले हात स्वच्छ धुतल्याने आपल्या हातावर असलेले विषाणू नष्ट होतात.




**निकट संपर्क टाळावा**

स्वतःमध्ये आणि खोकणाऱ्या किंवा शिंकणाऱ्या व्यक्तिमध्ये कमीतकमी १ मीटर (3 फूट) चे अंतर ठेवा.

**का करावे?**

जेव्हा एखाद्या व्यक्तीला खोकला किंवा शिंक येते तेव्हा त्याच्या नाकातून किंवा तोंडातून लहान द्रव थेंबा वाटे फेकले जातात, ज्यात विषाणू असू शकतो. जर तुम्ही त्या व्यक्तीच्या खूप जवळ असाल तर तुमच्यादेखील शरीरात प्रवेश करण्याची शक्यता असते.



**डोळे, नाक आणि तोंडाला स्पर्श करणे टाळावे**

**का करावे?**

आपल्या हाताद्वारे बऱ्याचशा वस्तू, फर्निचर, हँडल्स इ. ठिकाणी स्पर्श केला जातो, ज्यामुळे विषाणू संक्रमणाची शक्यता असते. एकदा का दूषित झाल्यास आपल्या हाता वाटे ते विषाणू डोळे, नाक किंवा तोंडात शिरकाव करतात. मग तेथून, विषाणू आपल्या शरीरात प्रवेश करून आपण आजारी पडू शकतो.

### हे करू नका.. ✗



सार्वजनिक ठिकाणी, उघड्यावर थुंकणे



तुम्हाला ताप व खोकला यांसारखी लक्षणे अस इतरांशी निकटचा संपर्क ठेवणे



प्राण्यांशी थेट संपर्क, तसेच कच्चे, अर्धवट शिजलेले अन्न खाणे



कत्तलखाने व उघड्यावर मांस असणाऱ्या ठिकाणी जाणे



थेट गर्दीच्या ठिकाणी जाणे



## आपले हात साबणाने स्वच्छ धुवा....

१) खोकल्यावर अथवा शिंकल्यानंतर २) स्वयंपाक करण्यापूर्वी, तयार करताना आणि तयार केल्यानंतर ३) एखाद्या आजारी व्यक्तीची काळजी घेताना ४) जेवणापूर्वी ५) शौचानंतर ६) प्राण्यांचा सांभाळ केल्यानं